शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१०/२०२५

श्री.विजय गोपाळ कांबळे
रा.३०३,३ रा मजला, साई मल्हार रेसिडेन्सी,
साने गुरूजी वसाहत, कोल्हापूर ४१६०१२
} तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. सरस्वती शिंदे एज्युकेशन सोसायटी,
सी/ओ डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर
२. डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर
महालक्ष्मी मंदीराजवळ, कोल्हापूर
} वि.प.

सरस्वती शिंदे एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर यांचे डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर यांचेकडील सहाय्यक प्राध्यापक श्री.विजय गोपाळ कांबळे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०३/०४/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१) दहिवडी येथे विद्यापीठाच्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांना घेवून जाणेसाठी मला दि.११ व १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी कर्तव्य रजा मंजूर होती. तथापि, दि.११ ऑक्टोंबर २०२३ रोजी सकाळी विद्यार्थ्यांना दहिवडीला घेवून जाताना दहिवडी नजीक आमच्या चारचाकी वाहनाचा अपघात घडला व माझ्या मणक्यांना जोराचा मार बसून मी जायबंदी झालो. डॉक्टरांच्या पुर्ण विश्रांतीच्या सल्ल्याने मी दि. ०१ नोव्हेंबर २०२३ पर्यंत विश्रांती व उपचार घेतले व दि.०२ नोव्हेंबर २०२३ रोजी कॉलेजला हजर झालो. अपघाताची माहिती प्राचार्यांना तात्काळ दिली व ते देखील डॉक्टरांचे सल्ल्यानुसार उपचार व विश्रांतीस सहमत झाले.

२) सदर अपघात मी कर्तव्यावर असताना झाल्यामुळे माझ्या दि.१३/१०/२०२३ ते दि.०१/११/२०२३ मधील अनुपस्थितीसाठी कर्तव्य रजा वाढविण्यासाठी किंवा सदर काळ म्हणून गणला जाणेसाठी मी दि.०४/११/२०२३ रोजी प्राचार्यांना विनंती अर्ज सादर केला. तथापि प्राचार्यांनी माझ्या सदर अर्जावर तब्बल एक वर्ष उलटून देखील मला काही कळवले नाही. वेळोवेळी पाठपुरावा केला असता प्रत्येक वेळी त्यांनी मला वैद्यकिय रजा घेवून प्रकरण मिटविण्यास सूचवले. त्यामुळे मी

दि. १०/०१/२०२५ रोजी प्राचार्यांना स्मरणपत्र दिले व वाढीव कर्तव्य रजा देणे विषयी किंवा संपूर्ण काळ कर्तव्य काळ गणला जाणे विषयी परत विनंती करून विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे जाण्याची सूचना दिली.

३) तदनंतर प्राचार्यांनी विद्यापीठाकडून मागवलेले मार्गदर्शन प्राप्त झाले नसलेचे मला दि.२१/०१/२०२५ च्या पत्राने कळवले. तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम क्रं.७५/७६(कर्तव्य पार पाडताना अपघात झाल्यास अनुज्ञेय होणारी रजा) नुसार नियमित वैद्यकिय रजे व्यतिरिक्त रजा देता येईल असे सांगून त्याप्रमाणे अर्ज करण्याचे सूचवले. परंतु माझ्या दिनांक ०४/११/२०२३ च्या अर्जात रजा मंजूरीसाठी आवश्यक ती सर्व माहिती देवून मी डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्रही दिले होते. त्यामुळे वेगळया अर्जाची गरज नसलेचे नमुद करून माझी अनुपस्थिती योग्य त्या नियमानुसार विनियमित करण्याची फेरविनंती मी दि.२७/०१/२०२५ रोजी प्राचार्यांना केली.

४) तदनंतर प्राचार्यांनी हे प्रकरण परत मार्गदर्शनासाठी विद्यापीठाकडे पाठवले. विद्यापीठाचे दि.२१/०२/२०२५ चे अस्पष्ट मार्गदर्शन आल्यानंतर प्राचार्यांनी दि.२७/०२/२०२५ च्या पत्रात, म्हणजे अपघातापासून तब्बल १६ महिन्यांनी, त्यांची भूमिका बदलली. दि.११/१०/२०२३ रोजी प्रत्यक्ष कर्तव्यावर मी पोहोचलो नसलेचे कारणावरून त्यांनी मंजूर केलेली दि.११ व १२ ऑक्टोंबर २०२३ ची कर्तव्य रजा रदद केली. तसेच मी सादर केलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रावर "Not for Medico Legal use" "Not for court Case use" ही नोंद निदर्शनास आणून परत एकदा वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करण्याचे त्यांनी सूचवले. शिवाय दि.२१/०१/२०२५ च्या पत्राने स्वताःच सुचविलेल्या व मला आक्षेप नसलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम क्रं.७५/७६ चा उल्लेख कोणतेही कारण न देता टाळला व प्रस्तुत प्रकरणी केवळ वैद्यकिय रजा देता येईल अशी मला नुकसानकारक ठरणारी भूमिका घेतली.

५) अपघात कर्तव्यावर असताना घडला तरीही प्राचार्यांनी संवेदनशिलता दाखवली नाही. उलट दि.११/१०/२०२३ रोजी मी कर्तव्यावर पोहोचलो नसलेचा तर्कशुन्य निष्कर्ष त्यांनी काढला. केवळ वैद्यकिय रजाच देता येईल असे विद्यापीठाचे थेट मार्गदर्शन नसताना तसा अर्थ काढला. अपघाताच्या सत्यतेबाबत शंका नसताना वैध असलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रावरील नोंदीचा मुद्दा उपस्थित केला. संबधित काळातील माझ्या अनुपस्थितीचे विनियमन योग्य त्या नियमानुसार करणे ही त्यांची जबाबदारी असताना रजा मंजूरीचा स्वेच्छाधिकार म्हणून ते या प्रकरणाकडे पाहत आहेत. या प्रकरणी माझी जबाबदारी केवळ घडलेली वस्तुस्थिती व वैद्यकिय प्रमाणपत्र वेळेत सादर करण्यापर्यंत सिमित आहे, जी

मी पार पाडली आहे. या उलट, माझी अनुपस्थिती कशा प्रकारे विनियमित करायची हे ठरवण्याची जबाबदारी प्राचार्यांची आहे, जी त्यांनी वेळेत पार पाडली नाही. दि.२७/०२/२०२५ चे त्यांचे निर्णय दि.२१/०१/२०२५ च्या त्यांच्या भुमिकेशी परस्पर विसंगत आहेत. माझे वेतन जसे माझ्या व्यक्तिगत गरजांसाठी आहे तसेच माझ्या वैद्यकिय रजा (प्रति वर्ष १०) माझ्या व्यक्तिगत वापरासाठी आहेत. त्यामुळे युवा महोत्सवास जाण्याचा प्रवास खर्च जसा माझ्या वेतनातून केला जावू शकत नाही तसेच या प्रकरणी माझ्या वैद्यकिय रजा खर्ची टाकल्या जावू शकत नाहीत. त्यामुळे प्राचार्यांचे दि.२७/०२/२०२५ चे निर्णय रद्दबातल होण्यास पात्र आहेत.

तरी आपणास विनंती आहे की मा.प्राचार्यांचे दि.२७/०२/२०२५ चे निर्णय रदद करावेत व माझ्या दि.०४/११/२०२३ रोजीच्या वैद्यकिय प्रमाणपत्रासहीत केलेल्या विनंती अर्जानुसार दि. ११/१०/२०२३ ते दि.०१/११/२०२३ या काळातील माझी अनुपस्थिती माझ्या नियमित वैद्यकिय रजा खर्ची न टाकता विनियमित करण्याचे आदेश आपण मा.प्राचार्यांना द्यावेत.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री.कांबळे हे दि.११ व १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी दहिवडी येथे युवा महोत्सवासाठी जात असताना, ते ज्या कारमधून प्रवास करत होते त्या कारला दहीवडी येथे कर्तव्यावर रूजू होण्यापुर्वी अपघात झाल्याचे त्यांनी मला कळविले. त्यानंतर मी व प्रा.डॉ.पी.आर.पवार असे दोघे मिळून श्री.कांबळे यांच्या घरी जावून त्यांची भेट घेतली व झालेल्या अपघाताविषयी माहिती घेतली व योग्य वैद्यकिय उपचार घेण्याचा सल्ला दिला. त्यामुळे प्राचार्यांनी संवेदनशिलता दाखविली नाही यासह त्यांनी आपल्या पत्रांमधून माझ्याबददल अशा प्रकारच्या शब्दांचा वापर केला आहे. त्याच्याशी मी सहमत नाही.

श्री.कांबळे यांनी दि.१३/१०/२०२३ ते दि.०१/११/२०२३ या कालावधीतील अनुपस्थितीच्या काळासाठी कर्तव्य रजा वाढवून देण्यासाठी अथवा सदरची अनुपस्थिती कर्तव्य काळ म्हणूनच धरला जावा यासाठी दि.०४/११/२०२३ रोजी अर्ज सादर केला. वरीष्ठ महाविद्यालयाकडील कार्यरत असणा-या शिक्षकांच्या रजेबद्दलच्या प्रचलीत तरतुदीनुसार, श्री.कांबळे यांनी मागणी केलेल्या रजेबददलीची तरतूद, विद्यापीठ अधिनियम १९७४ मध्ये नसल्याने मी श्री.कांबळे यांचा अर्ज इकडील पत्र क्रं. डीडीएस/३१९/२०२३-२४ दि.२०/११/२०२३ मार्गदर्शन प्राप्त झाले नाही.

श्री.कांबळे यांच्या रजेबददल सहानुभूती असल्यानेच विद्यापीठ अधिनियम १९७४ मध्ये तरतूद नसताना ही, माझ्या अधिकाराचा वापर करून, दि.२१/०१/२०२५ च्या पत्रानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम क्रमांक ७५/७६ नुसार महाराष्ट्र शासनामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

तरतूद असलेल्या रजा नियमावली अंतर्गत त्यांना, रजेबददल अर्ज करण्यासाठी सूचित केले होते. परंतू त्यांनी आपल्या दि.२७/०१/२०२५ च्या पत्रान्वये दि.०४/११/२०२३ रोजीचा अर्ज, रजेसाठी ग्राहय धरून दि.११/१०/२०२३ ते दि.०१/११/२०२३ याकालावधीतील रजा मंजूर करण्याबद्दल कळविले. श्री.कांबळे यांचे दि.२७/०१/२०२५ च्या पत्राचे अवलोकन केल्यास, असे निदर्शनास येते की, त्यांनी स्वतःच उपभोगलेल्या रजेचे विनियमित करण्याबददल प्रशासनाला आवश्यक सहकार्य केले नाही. उलट ही जबाबदारी फक्त प्राचार्यांची असली तरी ज्या तरतूदीखाली रजा विनिमित करावयाची आहे. त्यासाठी अर्ज करण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही. चर्चेने सुटणारा प्रश्न त्यांनी स्वतःहून जटील करून नाहक प्रशासकीय काम वाढविलेले आहे.

श्री.कांबळे यांनी आपल्याच रजेबददल वरीलप्रमाणे सहकार्य केले नसल्याने मी पुन्हा जा.क्रं. डीडीएस/११३६/२०२४-२५ दि.३१/०१/२०२५ च्या पत्रान्वये विद्यापीठाकडे मार्गदर्शन मागविले. विद्यापीठाच्या प्राप्त मार्गदर्शनानुसार(विद्यापीठाचे दि.जा.क्रं.शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/प्रशांत/३०३ दि.२१/०२/२०२५ चे पत्र) त्यांना दि.२७/०२/२०२५ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. त्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. उलट विद्यापीठाच्या मार्गदर्शनाचा त्यांनी आपल्याकडे दिलेल्या तक्रारीत मोघम असा उल्लेख केलेला आहे.

श्री.कांबळे प्रवास करत असलेल्या कारला झालेला अपघात हा, ते प्रत्यक्ष कर्तव्यावर रूजू होण्यापुर्वी झालेला असल्याने, याबाबत विद्यापीठाच्या प्राप्त मार्गदर्शनानुसार महाविद्यालयीन शिक्षकांना रजा मंजूर करताना विद्यापीठ अधिनियम १९७४ मधील वैद्यकिय व संबधित असणारे रजा प्रकार यानुसारच रजा मंजूर करणे अनिवार्य आहे. विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार व त्यांनी मला दि.२७/०१/२०२५ रोजी सादर केलेल्या पत्रामधील पुढील मजकुरानुसार “माझ्या अनुपस्थितीचा काळ माझ्या साठलेल्या व्यक्तिगत वैद्यकिय रजांमधून खर्ची न टाकता तो कर्तव्य काळ म्हणून गणला जावा ही विनंती मी माझ्या दि.०४/११/२०२३ रोजीच्या अर्जात कली होती. ती जर मान्य होत नसेल तर माझ्या अनुपस्थितीचा काळ कशा प्रकारे विनियमित करायचा हे ठरवण्याची जबाबदारी आपली होती व आहे”. असे त्यांनी मला सूचीत केल्याने त्यांच्या सूचनेनुसार रजेबद्दल निर्णय घेण्यात आला असून तसे त्यांना दि.२७/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

वरील संपूर्ण घटना क्रमाचे अवलोकन केल्यास, प्राचार्यांनी आपल्या रजेबद्दलचा निर्णय घेण्यास विलंब केला हे श्री.कांबळे यांचे म्हणणे संयुक्तिक नाही. श्री.कांबळे मागणी करत असलेल्या रजेची तरतूद महाविद्यालयीन शिक्षकांना देय रजा नियमावलीत दिसत नाही. त्यासाठी योग्य मार्गदर्शन, रजा दस्तऐवज उपलब्ध होण्यासाठी विलंब झाला. महाविद्यालयाचे प्रशासकीय कामकाज सांभाळत एखाद्या

प्रकरणावर योग्य ते नियमावलीबाबतचे दस्तऐवज उपलब्ध झाले नाही तर, योग्य निर्णयासाठी विलंब होण्याची शक्यता असते.

श्री.कांबळे हे मागणी करीत असलेली रजा विद्यापीठ अधिनियम १९७४ मध्ये दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी मागण केलेली रजा मंजूर करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत प्रकरणात समितीने दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकून घेतला. जाबदार यांनी दहिवडी येथे होणा-या विद्यापीठाच्या युवा महोत्सवासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना घेवून जाण्याकरिता तक्रारदार यांना दि.११ व १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी कर्तव्य रजा मंजूर करून तसा आदेश दिलेला होता. त्यानुसार तक्रारदार हे दि.११ ऑक्टोंबर २०२३ रोजी दहीवडी येथे खाजगी वाहनाने विद्यार्थ्यांना घेवून जात असताना त्यांच्या वाहनाला अपघात झाला आणि त्यात तक्रारदार हे जखमी झाले याबाबत उभयपक्षी कोणतेही मतभेद नाहीत.

तक्रारदार यांनी अपघातानंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार त्यांना बेड रेस्ट सांगण्यात आली होती. त्यामुळे दि.१३/१०/२०२३ ते दि.०१/११/२०२३ या कालावधीत ते कर्तव्यावर अनुपस्थित राहिले. या अनुपस्थिती कालावधीत कर्तव्य रजा वाढविण्यात यावी किंवा तो काळ कर्तव्य काळ म्हणून गणला जाणेसाठी तक्रारदार यांनी दि.०४/११/२०२३ रोजी प्राचार्यांना पत्राव्दारे विनंती केली. तथापि, ब-याच कालावधीमध्ये त्यांना महाविद्यालयाकडून कोणतेही उत्तर मिळाले नाही. जाबदार यांनी या प्रकरणी विद्यापीठाकडून मार्गदर्शन मागविले. विद्यापीठाकडून अस्पष्ट मार्गदर्शन आल्यानंतर जाबदार यांनी दि.२७/०२/२०२५ रोजीच्या पत्राने तक्रारदार हे दि.११/१०/२०२३ रोजी कर्तव्यावर पोहचले नसल्याचे कारण देत त्यांना दि.११ व १२ ऑक्टोंबर २०२३ रोजीची मंजूर केलेली कर्तव्य रजा रदद करण्यात आल्याचे तसेच दि.११/१०/२०२३ ते ०१/११/२०२३ या कालावधीसाठी त्यांना वैद्यकिय रजा मंजूर करण्यात येईल, याबाबत त्यांनी वैद्यकिय प्रमाणपत्रासह वैद्यकिय रजेचा अर्ज सादर करावा असे कळविले आहे. तसेच या कालावधीतील गैरहजेरीचे स्वरुप अद्यापही महाविद्यालयाकडून ठरवण्यात आलेले नसल्याचे म्हणणे मांडलेले आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये तक्रारदार यांनी मागणी केलेल्या रजेबददलीची तरतूद, विद्यापीठ अधिनियम १९७४ नुसार महाविद्यालयीन शिक्षकांच्याकरीता असणारे परिनियमांमध्ये नसल्याने या कालावधीत कोणत्या पध्दतीची रजा तक्रारदाना मंजूर करावी याबाबतचे मार्गदर्शन त्यांनी विद्यापीठाकडून मागितले तथापि, ते मागदर्शन जाबदारांना मिळालेले नाही. त्यानंतर पुन्हा जा.क्रं.डीडीएस/११३६/२०२४-२५ दि.३१/०१/२०२५ च्या पत्रान्वये विद्यापीठाकडे याबाबत मार्गदर्शन

मागविले. विद्यापीठाच्या प्राप्त मार्गदर्शनानुसार तक्रारदार यांना दि.२७/०२/२०२५ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. परंतू तक्रारदार यांनी त्याला प्रतिसाद दिलेला नाही असे नमूद केले आहे.

दोन्ही पक्षकारांनी मांडलेले म्हणणे अवलोकनी घेता समितीच्या असे निदर्शनास येते की, तक्रारदार यांचे सदर कालावधीतील गैरहजरीचे स्वरुप, असाधारण रजा किंवा अर्जित रजा किंवा नैमित्तीक रजा हे अजून ठरवण्यात आलेले नाही. तक्रारदाराचे कथन असे आहे की, सदर गैरहजेरीचा कालावधी हा त्यांच्या कर्तव्याचा कालावधी समजण्यात यावा आणि त्यानुसार आदेश पारित करण्यात यावा. ही बाब नमूद करणे आवश्यक आहे की, या गैरहजेरीच्या कालावधीतील तक्रारदाराचे वेतन तक्रारदाराला मंजूर करण्यात आलेले असून ते त्यांना अदा करण्यात आलेले आहे. तसेच ही बाब देखील उभयपक्ष यांना मान्य आहे की, तक्रारदारांनी त्या कालावधीतील आपल्या गैरहजेरीबाबत कोणत्याही प्रकारच्या रजेचा अर्ज जाबदारांना सादर केलेला नाही. युक्तिवादादरम्यान तक्रारदार यांनी त्यांना वैद्यकीय व अर्जित रजा अनुज्ञेय आहेत. तथापि, त्या रजा खर्ची न टाकता त्याच्या सदर कालावधीतील गैरहजेरीचे स्वरुप हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे अशी मागणी समितीसमोर केलेली आहे.

उभयपक्षाचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आणि प्राध्यापकांना अनुज्ञेय असणा-या रजा संबंधिचे नियम तपासून पाहिल्यानंतर या समितीच्या असे निदर्शनास येते की, तक्रारदार मागतात त्या प्रमाणे कोणतीही रजा कोणत्याही कर्तव्य कालावधी समजण्या बद्दलचे नियम अस्तित्वात नाहीत. तक्रारदार यांना त्यांच्या या अनुपस्थिती काळातील गैरहजेरीबाबत वैद्यकीय रजेचा अर्ज दाखल करावा लागेल किंवा असाधारण रजेचा वेतनाशिवाय अर्ज दाखल करावा लागेल या दोन्ही पर्यायाना तक्रारदारांनी स्पष्टपणे या समितीसमोर नकार दिलेला आहे. समितीच्या ही बाब निदर्शनास येते की, जाबदार यांनी तक्रारदार यांचे या गैरहजेरीच्या कालावधीचे वेतन तक्रारदार यांना या आधीच अदा केलेले आहे. तक्रारदार यांच्या गैरहजेरी काळातील रजेचे स्वरुप न ठरवता जाबदार यांनी त्या कालावधीतील वेतन तक्रारदार यांना दिले आहे आणि तक्रारदार यांनी ते स्वीकारलेले आहे. तक्रारदार यांच्या ते गैरहजेरी कालावधीत कर्तव्यावर होते या मागणीस कायदयाचे कोणतेही समर्थन नाही. या समितीने सुचविलेला मध्य मार्ग उभयपक्षी मान्य करण्यात आलेला नाही. तक्रारदार मागणी करतात त्या स्वरुपाची मागणी मंजूर करण्याला कोणतेही कायदेशीर अनुष्ठान नाही. त्यामुळे तक्रारदाराची मागणी समितीस मान्य करता येत नाही.

सबब प्रस्तूतची तक्रार मान्य न करता ती खारिज करावी लागेल असे या समितीचे मत आहे. करिता समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

आदेश

सदरची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 26 SEP 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)